# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली– ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२–२२३१०४ E-Mail :gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/ ४५१७

दिनांक २८/०६/२०२१.

अत्यंत तातडीचे/कालमर्यादित

## (परीपत्रक)

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय :– अशासकिय अनुदानित महाविद्यालयांमधील कार्यरत अध्यापकांची अनुदानित पदावर नियुक्ती होण्यापुर्वी असलेली कायम विना अनुदानित पदावरील सेवा केवळ स्थाननिश्चितीसाठी ग्राहय धरल्यास येणाऱ्या आर्थिक भाराबाबतची माहीती प्रपत्रात भरुन त्वरीत सादर करण्याबाबत

संदर्भ :– १. उशिनाग/शिक्षक स्थान सेवा/कायम/विनाअनुसेवा/३२४८/२०२१ दिनांक १४/०६/२०२१
२.युएनआय/(१२९/१७) अधी.३/विशि.१/५२५१ दिनांक १६ मार्च २०२१

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयांन्वये आपणांस सुचित करण्यात येते कि, अशासकिय अनुदानित महाविद्यालय/विद्यापीठ कार्यरत अध्यापकांची अनुदानित पदावर नियुक्ती होण्यापुर्वी असलेली कायम विना अनुदानित पदावरील सेवा केवळ स्थाननिश्चितीसाठी ग्राहय धरल्यास येणाऱ्या आर्थिक भाराबाबत मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर यांच्या कार्यालयांकडुन पत्र प्राप्त झालेले असुन सदर पत्र सोबत संलग्नित करण्यात येत आहे.

उक्त पत्राच्या अनुषंगाने आपल्या अनुदानित महाविद्यालयात कार्यरत अध्यापक पदावर नियुक्त होण्यापुर्वी कायम विना अनुदानित पदावर सेवा करीत होते अशा अध्यापकांनी त्यांची कायम विनाअनुदानित पदावरील सेवा ही अनुदानित पदावरील कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीसाठी जोडुन घेण्यासंदर्भात महाविद्यालयांत /विद्यापीठातील सेवेबाबतची माहीती कॅससाठी जोडुन धरल्यास येणारा आर्थिक भार (वार्षिक) सह माहीती मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, नागपुर विभाग, नागपुर यांच्या पत्रामधील मुदयांचे अवलोकन करुन खालील प्रपत्रात भरुन दिनांक ०४/०७/२०२१ पर्यंत त्वरीत महाविद्यालयीन विभागाच्या **arcollegesectiongug48@gmail.com** या मेल आय–डी वर **Excel file** मध्ये पाठविण्यात यावी. तसेच **Hard Copy** विद्यापीठात त्वरीत सादर करावे. सदर बाबत महाविद्यालयांत अध्यापक नसतील तर त्याबाबतची माहीती निरंक म्हणुन नमुद करुन पाठवावी.

| अ. क्र | महाविद्यालयाचे नांव | अध्यापकांचे नाव | कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील सेवेचा कालावधी (पासुन–पर्यत) | अनुदानित महाविद्यालयांतील सेवेचा कालावधी (पासुन–पर्यंत) | कायम विनाअनुदानित पदावरील सेवा कॅस साठी जोडुन धरल्यास येणारा अर्थिक भार(वार्षिक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |

२९/६/२०२१

(डॉ. अनिल झेड. चिताडे)
कुलसचिव (प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र –संलग्नित उपरोक्तप्रमाणे

महाराष्ट्र शासन
कार्यालय सहसंचालक,उच्च शिक्षण नागपूर विभाग नागपूर.
जूने मॉरीस कॉलेज ईमारत परीसर सिताबर्डी,नागपूर.
(दुरध्वनी क्र०७१२-२५६१७१३ फॅक्स क्र०७१२-२५५४२१०)
Website.www.jdnagpur.in Email-jdhengp @rediffmail.com

क्रमांक :- उशनाग/शिक्षक स्थान सेवा/कायम/विनाअनु सेवा/३२७८/२०२१ दिनांक-१४/०६/२०२१

**परिपत्रक**

प्रति,

१. कुलसचिव, रा.तु.म.नागपूर विद्यापीठ नागपूर.
२. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.
३. कुलसचिव, कविकुलगुरु कालीदास संस्कृत विद्यापीठ रामटेक.
४. प्राचार्य,सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालय, नागपूर विभाग नागपूर.

विषय :- **अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील कार्यरत अध्यापकांची अनुदानित पदावर नियुक्ती होण्यापुर्वी असलेली कायम विनाअनुदानित पदावरील सेवा केवळ स्थाननिश्चितीाठी ग्राहय धरल्यास येणाऱ्या आर्थिक भाराबाबत...**

संदर्भ :- १. मा.संचालनालयाचे पत्र क्र.युएनआय/(१२९/१७)/अधी-३/विशि-१/२१७६, दि.२२.०२.२०२१
२. या कार्यालयाचे पत्र क्र.उशिनाग/शिक्षक स्थान सेवा/कायम/विनाअनु सेवा/१०६९/२०२१, दि.२२.०२.२०२१.

उपरोक्त विषयी संदर्भिय संचालनालयाचे पत्राच्या अनुषंगाने सर्व विद्यपीठ तसेच महाविद्यालयांना कळविण्यात येते कि, या विभागाअंतर्गत असलेले सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठात कार्यरत अध्यापक हे अनुदानित पदावर नियुक्त होण्यापुर्वी कायम विनाअनुदानित पदावर सेवा करीत होते.

अशा अध्यापकांनी त्यांची कायम विनाअनुदानित पदावरील सेवा ही अनुदानित पदावरील कॅस अंतर्गत स्थानिश्चितीसाठी जोडुन घेण्यासंदर्भात महाविद्यालयात/विद्यापीठातील सेवेबाबतची माहिती कॅससाठी जोडून धरल्यास येणारा आर्थिक भार (वार्षिक) सह माहिती खाली दिलेल्या तक्त्यात या कार्यालयास **न चुकता खास दुतामार्फत तसेच ई-मैल व्दारे (मध्ये सॉफ्ट कॉपी व पीडीएफ सह) या कार्यालयास सादर करावी.**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | अध्यापकाचे नाव | कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवेचा कालावधी (पासून-पर्यंत) | अनुदानित महाविद्यालयातील सेवेचा कालावधी(पासून-पर्यंत) | कायम विनाअनुदानित पदावरील सेवा कॅस साठी जोडून धरल्यास येणारा आर्थिक भार (वार्षिक) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

तसेच सदरची माहिती सादर करताना खालील बाबींची खात्री करण्यात यावी :-

१) कायम विनाअनुदानित महाविद्यालय हे शासनमान्यता प्राप्त व ते विद्यापीठाशी संलग्नित असावे.

२) संबधित अध्यापकाची नियुक्ती ज्या अभ्यासक्रमासाठी झालेली आहे तो अभ्यासक्रम विद्यापीठाशी संलग्नित असणे आवश्यक आहे.

h:\a_2018_general docx

३) सदर अध्यापक कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये नियुक्ती होतेवेळेस वेळोवेळी युजीसी/शासनाने/शिखर संस्था यांनी विहित केलेली शैक्षणिक/व्यावसायिक अर्हता धारण करणारा असावा.

४) सदर कायम विनाअनुदनित तत्वावरील नियुक्ती वेळोवेळी विद्यापीठ अनुदान आयोग/शासन/विद्यापीठाने विहित केलेल्या निवड प्रक्रियेव्दारे तसेच हिते निवड समितीमार्फत झालेली असावी.

५) सदर नियुक्ती जाहिरात विद्यापीठ नियमानुसार असणे आवश्यक आहे.

६) या नियुक्तीस विद्यापीठाची पूर्णवेळ विनाअट वैयक्तिक मान्यता असणे आवश्यक आहे.

**सहपत्र** - संचालनालयाचे पत्र संलग्नित.

Sanjekar

**(वनिता यु. सांजेकर)**
प्रशासन अधिकारी
कार्यालय,सहसंचालक, उच्च शिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर.

**प्रत** — १. मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. सर्व कार्यासन यांना माहिती संकलीत करण्याकरीता अग्रेषित.

आवक क्र. 686
[illegible]
[illegible] - ४११००१
दि. 16/3/2021

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.

www.dhepune.gov.in Email- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्रमांक- युएनआय/(१२९/१७)/अर्था.३/विशि-१ / 4248 दिनांक- 16 MAR 2021

स्मरणपत्र : 1

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.

विषय अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील कार्यरत अध्यापकाची अनुदानित पदावर नियुक्ती होण्यापुर्वी असलेली कायम विनाअनुदानित पदावरील सेवा केवळ स्थाननिश्चितीसाठी ग्राहय धरल्यास येणा-या आर्थिक भाराबाबत.

संदर्भ- संचालनालयाचे समक्रमांक दिनांक २२ फेब्रुवारी, २०२१

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्यातील जे अशासकीय अनुदानित महाविद्यालयात कार्यरत अध्यापक हे अनुदानित पदावर नियुक्त होण्यापुर्वी कायम विनाअनुदानित पदावर सेवा करीत होते, अशा अध्यापकांनी त्यांची कायम विनाअनुदानित पदावरील सेवा ही अनुदानित पदावरील कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीसाठी जोडून धरण्याबाबत शासनास निवेदने प्राप्त होत आहेत.

त्या अनुषंगाने आपल्या विभागामधील अनुदानित पदावर कार्यरत अध्यापकांची पुर्वीची कायम अनुदानित पदावरील सेवा केवळ कॅस अंतर्गत स्थाननिश्चितीसाठी जोडून घेण्यासंदर्भात असे किती अध्यापक आहेत तसेच या अध्यापकांची कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवा अनुदानित पदास केवळ कॅससाठी जोडून धरल्यास किती आर्थिक भार शासनावर येईल याबाबतची माहिती खालील तक्त्यात नमूद करुन या संचालनालयास पाठविण्याबाबत संदर्भिय पत्रानुसार कळविलेले आहे..

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | अध्यापकाचे नांव | कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील सेवेचा कालावधी (पासून-पर्यंत) | अनुदानित महाविद्यालयातील सेवेचा कालावधी (पासून-पर्यंत) | कायम विनाअनुदानित पदावरील सेवा कॅस साठी जोडून धरल्यास येणारा आर्थिक भार (वार्षिक) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

Urgent
[illegible] 16/3/21

तसेच सदरची माहिती सादर करतांना खालील बाबींची खात्री करण्यात यावी.

१.कायम विनाअनुदानित महाविद्यालय हे शासनमान्यता प्राप्त व ते विद्यापीठाशी संलग्नित असावे. तसेच संबंधित अध्यापकाची नियुक्ती ज्या अभ्यासक्रमासाठी झालेली आहे तो अभ्यासक्रम विद्यापीठाशी संलग्नित असणे आवश्यक आहे. सदर अध्यापक कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये नियुक्ती होतेवेळेस वेळोवेळी युजीसी /शासनाने/शिखर संस्था यांनी विहित केलेली शैक्षणिक/व्यावसायिक अर्हता धारण करणारा असावा. सदर कायम विनाअनुदानित तत्त्वावरील नियुक्ती वेळोवेळी विद्यापीठ अनुदान आयोग / शासन / विद्यापीठाने विहित केलेल्या निवड प्रक्रियेद्वारे तसेच विहित निवड समितीमार्फत झालेली असावी. तसेच सदर नियुक्तीची जाहिरात विद्यापीठ नियमानुसार असणे आवश्यक आहे. या नियुक्तीस विद्यापीठाची पुर्णवेळ विनाअट वैयक्तिक मान्यता असणे आवश्यक आहे.

तथापि अद्याप कोणत्याही विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी आपली माहिती सादर केलेली नाही. तरी सदरची माहिती तात्काळ या संचालनालयास पाठविण्यात यावी.

(सुयश दुसाने)
प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१